| | | |
|---|---|---|
| MHPU190019492026 | दाखल दिनांक | ०२.०७.२०२६ |
| | नोंदणी दिनांक | ०२.०७.२०२६ |
| | निकाल दिनांक | ०९.०७.२०२६ |
| | कालावधी | वर्ष महिने दिवस |
| | | ०० ०० ०७ |

---

**न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, लोहमार्ग न्यायालय, दौंड, जि. पुणे यांचे न्यायालय**
**(पिठासीन अधिकारी सुनिल श. दहातोंडे यांचे समक्ष)**

---

**नियमित फौजदारी खटला क्र. ४०/२०२६** **निशाणी क्र. १५**

प्रथम खबर अहवाल क्र.८६/२०२६, लोहमार्ग पोलीस स्टेशन, दौंड, जि. पुणे.

| | |
|---|---|
| अभियोग पक्ष | महाराष्ट्र शासन,<br>लोहमार्ग पोलीस स्टेशन, दौंड, जि. पुणे. |
| अभियोग पक्षातर्फे | श्रीमती पी.डी. शिंदे,<br>सहाय्यक सरकारी अभियोक्ता |
| आरोपी | आकाश विजय शेंडगे<br>वयः २७ वर्षे, व्यवसायः मजुरी,<br>राहणारः शेडगे वस्ती, केडगांव,<br>ता. दौंड, जि. पुणे. |
| आरोपीतर्फे विधिज्ञ | श्रीमती कावेरी गुरसळ, विधिज्ञ |

| | |
|---|---|
| घटनेचा दिनांक | १६.०६.२०२६ |
| प्रथम खबरी अहवालाचा दिनांक | १६.०६.२०२६ |
| दोषारोपपत्र दाखल दिनांक | ०२.०७.२०२६ |
| दोषारोप निश्चिती दिनांक | ०२.०७.२०२६ |

| | |
|---|---|
| पुरावा नोंदविण्यास सुरु केल्याचा दिनांक | ०२.०७.२०२६ |
| न्यायनिर्णय निश्चीत दिनांक | ०९.०७.२०२६ |
| न्यायनिर्णय पारीत दिनांक | ०९.०७.२०२६ |
| सिध्ददोषी बाबतचा आदेश, असल्यास, दिनांक | ०९.०७.२०२६ |

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीन तारीख | ठेवलेले दोषारोप | निर्दोष किंवा दोषी | सुनावलेली शिक्षा | भा.ना.सु.सं.चे कलम ४६८ प्रमाणे सुट द्यावयाचा कारागृहातील कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | आकाश विजय शेंडगे | १८.०६.२०२६ | न्याया धीन बंदी | भारतीय न्याय संहिता, २०२३ कलम ३०३(२) प्रमाणे. | अंतिम आदेशा प्रमाणे दोषी धरण्यात आले आहे. | अंतिम आदेशा प्रमाणे | १८.०६.२०२६ ते ०८.०७.२०२६ |

## अभियोग पक्षाच्या साक्षीदारांची यादी

| क्रमांक | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| अ.सा.क्र.१ | झुबेर उमर शेख | पंच साक्षीदार |
| अ.सा.क्र.२ | समाधान बालाजी तिकटे | फिर्यादी |
| अ.सा.क्र.३ | अरुण आत्माराम टिंगरे | तपासी अंमलदार |

**बचाव पक्षाचे साक्षीदार** : निरंक

**न्यायालयातर्फे साक्षीदार** : निरंक

**अ. अभियोग पक्षातर्फे देण्यात आलेल्या निशाणींची यादी**

| क्रमांक | निशाणी क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| १ | ०७ | जप्ती पंचनामा |
| २ | ०९ | फिर्याद |
| ३ | ११ | मुद्देमाल पावती |
| ४ | १२ | भा.पु.सं. ३५(३) अन्वये आरोपीस दिलेली नोटीस. |

**ब. बचाव पक्षातर्फे मान्य करण्यात आलेल्या कागदपत्रांचा तपशीलः**

| क्रमांक | निशाणी क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| | निरंक | |

**क. न्यायालयातर्फे दिलेल्या निशाणींची यादी– निरंक**

**ड. महत्वाच्या वस्तुंना दिलेल्या निशाणी– निरंक**

**न्यायनिर्णय**

(घोषित दिनांक ०९ जुलै, २०२६)

प्रस्तुत खटला आरोपीविरुध्द भारतीय न्याय संहिता, २०२३ (यापुढे संक्षेपाने 'भा.न्या.सं.'असा उल्लेख केला आहे) कलम ३०३(२) प्रमाणे गुन्हा केल्याचे आरोपावरुन चालविण्यात आला.

**संक्षिप्त स्वरुपात अभियोग पक्षाचे कथन खालीलप्रमाणेः–**

२. दिनांक १६.०६.२०२६ रोजी फिर्यादी समाधान बालाजी तिकटे याने वर्दी दिली की, दिनांक १६.०६.२०२६ रोजी दुपारी १.०० वाजण्याच्या सुमारास लातुर गावी जाण्यासाठी दौंड रेल्वे स्थानकाच्या फलाट क्र. ३ वर रेल्वेची वाट पाहत थांबले असता गाडी येण्यास वेळ असल्यामुळे डुलकी लागली होती. फिर्यादीच्या झोपेचा गैरफायदा घेऊन पॅन्टच्या खिशातील सॅमसंग कंपनीचा एफ–१७, ५–जी, आकाशी रंगाचा भ्रमणध्वनी रक्कम रुपये १९,९९९/–, आयएमईआय क्र. ३५२८२२५७७६६८०३२ व ३५३५४२४२७६६८०३७, व्हीआय चे सिम क्र. ७७९६४९८१२९ सह अज्ञात इसमाने चोरी केला होता. फलाटवरील वडा–पाव विक्रेत्याकडे चौकशी केली असता काळ्या रंगाच्या वय वर्षे २५ च्या इसमाने झोपेचा फायदा घेऊन भ्रमणध्वनीची चोरी केली होती. याआधारे, फिर्यादीने दिलेल्या वर्दीवरुन लोहमार्ग पोलीस ठाणे, दौंड येथे आरोपीविरुध्द गु.र.क्र.८६/२०२६, भा.न्या.सं. कलम ३०३ प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला होता.

३. श्री. ए. ए. टिंगरे, पोलीस हवालदार यांनी सदर भ्रमणध्वनी आरोपीच्या

ताब्यातुन पंचासमक्ष जप्त करुन जप्ती पंचनामा केला होता. साक्षीदारांचे तपास टिपण नोंदविले. तपासामध्ये आरोपीने भ्रमणध्वनी चोरी केल्याचे निष्पन्न झाल्यामुळे आरोपीविरुद दोषारोपपत्र दाखल केले.

४. आरोपीविरुध्द भा.न्या.सं. कलम ३०३(२) प्रमाणे गुन्हा निशाणी क्र. ०४ वर आरोप निश्चित करण्यात आले. आरोपीला दोषारोपामधील मजकूर वाचुन व समजावुन सांगितला असता, त्याने दोषारोप मान्य नसल्याचे सांगुन संपरिक्षेची मागणी केली. आरोपीचे भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ कलम ३५१(१)(ब) निवेदन निशाणी क्र.१४ अन्वये नोंदविण्यात आले.

५. अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती पी. डी. शिंदे व आरोपीच्या वतीने श्रीमती कावेरी गुरसळ, विधिज्ञ यांचा केलेला युक्तिवाद श्रवण केला. कागदपत्राचे अवलोकन केले. प्रस्तुत खटल्यात खालील मुद्दे निष्कर्षासाठी उपस्थित झालेले आहेत, त्यावरील माझे निष्कर्ष कारणमिमांसासहीत खालीलप्रमाणेः–

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | आरोपीने दिनांक १६.०६.२०२६ रोजी सकाळी ११.३० ते दुपारी १.०० वाजण्याच्या सुमारास दौंड रेल्वे स्टेशनवरील फलाट क्र. ३ वर फिर्यादीचा झोपेचा फायदा घेऊन सॅमसंग कंपनीचा एफ–१७, ५ –जी भ्रमणध्वनीची चोरी केल्याचे अभियोग पक्ष सिध्द करतो काय? | ... होय |
| २. | अंतिम आदेश काय? | आरोपीला दोषसिध्द धरण्यात येऊन अंतिम आदेशाप्रमाणे शिक्षा देण्यात येत आहे. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्रमांक १ बाबतः–**

६. फौजदारी खटल्यामध्ये आरोपी निर्दोष आहे, हे गृहितक मुळ तत्व आहे. आरोपीवरील गुन्हा निःसंशयातीतरित्या शाबित होणे अनिवार्य आहे. आरोपीने फिर्यादीचा

सॅमसंग कंपनीचा एफ–१७ भ्रमणध्वनी संमतीशिवाय स्थानभ्रष्ट केला हे अभियोगपक्षाने सिध्द करणे आवश्यक आहे. अभियोग पक्षाने एकूण तीन साक्षीदारांच्या साक्षी नोंदविण्यात आल्या आहेत.

७. अभियोग पक्षातर्फे फिर्यादी सा.क्र.२ समाधान यांच्या मौखिक पुराव्यावरुन असे ध्वनित होते की, दिनांक १६.०६.२०२६ रोजी दुपारी ०१:०० वाजण्याच्या सुमारास दौंड रेल्वे स्थानक फलाट क्र. ३ वर लातुर येथे जाण्यासाठी रेल्वेची वाट पाहत झोपले होते. झोपेत असतांना पॅन्टच्या डाव्या खिश्यातून अज्ञात इसमानी सॅमसंग कंपनीचा निळ्या रंगाचा भ्रमणध्वनी काढुन घेतला होता. फलाट क्र. ३ वरील वडापावच्या दुकानात चौकशी केली असता काळ्या रंगाचा टी शर्ट घातलेल्या इसमाने भ्रमणध्वनी काढून घेतला होता. घटनेची फिर्याद निशाणी ९ प्रमाणे दिली होती. भ्रमणध्वनी पोलीसांकडून परत मिळाला आहे. आरोपीला दृकश्राव्य माध्यमाद्वारे न्यायालयासमक्ष ओळखले. सदर साक्षीदाराने उलटतपासामध्ये स्पष्टपणे मान्य केले की, भ्रमणध्वनी चोरताना प्रत्यक्षपणे बघितले नाही. इतर सर्व सुचक प्रश्नांची उत्तरे नकारार्थी दिली आहेत.

८. फिर्याद निशाणी क्र. ९ चे अवलोकन केले असता असे ध्वनित होते की, दिनांक १६.०६.२०२६ रोजी फिर्यादी सा.क्र. २ समाधान यांचा सॅमसंग कंपनीचा एफ–१७ कंपनीचा भ्रमणध्वनी दौंड रेल्वे स्थानक येथील फलाट क्र. ३ वर झोपेत असताना अज्ञात इसमाने चोरी केल्याबाबत दाखल केलेली आहे. सा.क्र. २ समाधान च्या मौखिक पुराव्याद्वारे फिर्याद निशाणी क्र. ९ सिध्द झाली असून फिर्याद निशाणी क्र. ९ च्या कथनास सा.क्र. २ समाधानच्या शपथेवरील कथनावरुन बळकटी मिळत आहे. सबब, फिर्यादीच्या उपरोक्त भ्रमणध्वनीची दौंड रेल्वे स्थानक येथील फलाट क्र. ३ वरुन चोरी झाल्याचे स्पष्ट होत आहे. परंतु, फिर्यादी सा.क्र. २ समाधान याने आरोपीला चोरी करताना प्रत्यक्ष बघितले नसल्यामुळे फिर्यादीच्या मौखिक पुराव्यावरुन आरोपीविरुध्द काहीही निष्पन्न होत नाही.

९. अभियोगपक्षाने फिर्यादीच्या उपरोक्त भ्रमणध्वनीची चोरी झाल्याचे सिध्द केले आहे. परंतु, सदरहू चोरी आरोपीनेच केली का हे पाहणे याठिकाणी महत्वाचे आहे. तपासी अंमलदार सा.क्र. ३ टिंगरे यांनी आरोपीच्या ताब्यातुन प्रस्तुत भ्रमणध्वनी पंचासमक्ष केल्याचे

कथन केले आहे. त्याअनुषंगाने महत्वाचे पंच सा.क्र. १ झुबेर यांच्या मौखिक पुराव्यावरुन असे ध्वनीत होते की, दिनांक १६.०६.२०२६ रोजी लोहमार्ग पोलीस ठाणे, दौंड येथे पंचनाम्यासाठी बोलावले होते. पोलीसांनी समक्ष आरोपीची अंगझडती घेतली असता आरोपीच्या ताब्यात फिर्यादीचा सॅमसंग कंपनीचा आकाशी रंगाचा भ्रमणध्वनी मिळून आल्यामुळे जप्त करुन पंचनामा निशाणी क्र. ७ अन्वये जप्ती पंचनामा केला होता. तसेच, सदर साक्षीदाराला आरोपीला दृकश्राव्यमाध्यमाव्दारे दाखविले असता आरोपीच्या ताब्यातुन उपरोक्त भ्रमणध्वनी जप्त करण्यात आला असल्याचे ओळखले होते. बचावपक्षातर्फे घेण्यात आलेल्या पंच सा. क्र. १ झुबेर याच्या मौखिक पुराव्यावर शंका उपस्थित होईल असे काहीही आले नाही. पंच साक्षीदार हा केवळ दौंड रेल्वे स्थानक येथे व्यवसाय करत असल्यामुळे व त्याची पोलीसांची ओळख असल्याचे या एकमेव कारणास्तव सा.क्र. १ झुबेर याच्या मौखिक पुराव्यावर शंका घेणे न्यायोचित ठरणार नाही, या निष्कर्षास मी येत आहे.

१०. जप्ती पंचनामा निशाणी क्र. ७ चे सुक्ष्म निरीक्षण केले असता, दिनांक १६.०६.२०२६ रोजी तपासी अंमलदार सा.क्र. ३ टिंगरे यांनी लोहमार्ग पोलीस ठाणे, दौंड येथे पंच सा.क्र. १ झुबेर व दुसरे पंच साक्षीदार हितेश दिलीप टेकचंदानी यांच्यासमक्ष आरोपीच्या ताब्यातुन सॅमसंग कंपनीचा एफ–१७ भ्रमणध्वनी आयएमईआय क्र. ३५२८२२५७७६६८०३२ व ३५३५४२४२७६६८०३७ जप्त करुन जप्ती पंचनामा केला होता. जप्ती पंचनामा निशाणी क्र. ७ मधील कथनास पंच सा.क्र. १ झुबेर व तपासी अंमलदार सा.क्र. ३ टिंगरे यांच्या मौखिक पुराव्यावरुन बळकटी मिळत आहे. अभियोगपक्षाच्या मौखिक पुराव्यावर शंका उपस्थित होईल असे बचावपक्षातर्फे काहीही अभिलेखावर आलेले नाही. सबब, अभियोगपक्षाने जप्ती पंचनामा निशाणी क्र. ७ निःसंशयातितरित्या सिध्द केला आहे.

११. प्रस्तुत गुन्हयातील तपासी अंमलदार सा.क्र. ३ टिंगरे यांचे मौखिक पुराव्यावरुन असे ध्वनित होते की, दिनांक १६.०६.२०२६ रोजी लोहमार्ग पोलीस ठाणे, दौंड येथे पोलीस हवालदार म्हणुन कार्यरत असताना गु.र.नं.८६/२०२६ चा तपास त्यांचेकडे वर्ग करण्यात आला होता. घटनेनंतर तात्काळ दौंड रेल्वे स्थानक फलाट क्र. ३ वरील विक्रेता आकाश डिगारदिवे याच्याकडे चौकशी केली असता, सदरचा भ्रमणध्वनी आकाश विजय शेंडगे

याने चोरी केल्याचे सांगितले होते. त्याअनुषंगाने आरोपीचा शोध घेतला असता, आरोपी हुतात्मा चौक दौंड येथे सदरचा भ्रमणध्वनीसह मिळुन आला होता. उपरोक्त बाब बचावपक्षातर्फे नाकारण्यात आली नाही. उपरोक्त विवेंचनाप्रमाणे सदरचा भ्रमणध्वनी पंचांसमक्ष आरोपीच्या जप्ती पंचनामा निशाणी क्र. ७ अन्वये जप्त करण्यात आला आहे.

१२. अभियोगपक्षाच्या मौखिक व कागदोपत्री पुराव्याचे एकत्रित मुल्यमापन केले असता फिर्यादीचा सॅमसंग कंपनीचा एफ–१७ भ्रमणध्वनी जप्ती पंचनामा निशाणी क्र. ७ अन्वये आरोपीच्या ताब्यातुन जप्त करण्यात आला आहे. जप्ती पंचनामा निशाणी क्र. ७ वर आरोपीचा अंगठा आहे. परंतु, जप्ती पंचनामा निशाणी क्र. ७ वर अंगठा आरोपीचा नसल्याची बचावपक्षातर्फे नाकारण्यात आली नाही किंवा आरोपीचा अंगठा तपासी अंमलदार किंवा इतर पोलीसांनी धाकधपटशा करुन घेतला असा आरोपीचा बचावसुध्दा नाही. सबब, आरोपीच्या ताब्यातून फिर्यादीचा उपरोक्त भ्रमणध्वनी जप्ती पंचनामा निशाणी क्र. ७ अन्वये जप्त केल्याचे निःसंशयातितरीत्या सिध्द होत आहे.

१३. भारतीय साक्ष अधिनियम, २०२३ चे कलम ११९(१) मधील उदाहरण क्र (अ) चोरी झाल्यानंतर थोड्याच वेळात चोरीचा माल ज्याच्या कब्जात सापडेल तो मनुष्य कब्जाबद्दल खुलासा करु न शकल्यास, एक तर तो चोर आहे किंवा तो माल चोरीचा असल्याचे माहित असताना त्याने स्विकारला असल्याचे गृहितकाचे मुळ तत्व आहे. त्याअनुषंगाने प्रस्तुत प्रकरणामध्ये आरोपीच्या ताब्यातुन फिर्यादीचा सॅमसंग कंपनीचा भ्रमणध्वनी जप्त केला आहे. आरोपीने चोरीचा मालाच्या कब्जाबद्दल काहीही स्पष्टीकरण दिले नाही. सबब, आरोपीने भारतीय साक्ष अधिनियम, २०२३ कलम ११९(१) चे उदाहरण क्रं (अ) मधील गृहीतकानुसार आरोपीने चोरी केल्याचे स्पष्ट होत आहे. अभियोग पक्षाच्या मौखिक व कागदोपत्री पुराव्याच्या आधारे व साक्षीदारांच्या शपथेवरील कथनान्वये आरोपीविरुध्द उपरोक्त कलमाअन्वये गुन्हा केल्याचे निःसंशयातीतरित्या सिध्द होत आहे.

१४. सबब, मुद्दा क्र.१ व २ करिता जास्त उहापोह न करता, विनासंकोच, मी या तथ्यविषयक व विधिविषय निष्कर्षास येत आहे की, आरोपीने फिर्यादीचा सॅमसंग कंपनीचा एफ–१७ भ्रमणध्वनी विनासंमती स्थानभ्रष्ट केल्याचे तथ्यविषयक व विधिविषयक निष्कर्षास

मी येत आहे. सबब, मी मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी देत आहे.

१५. आरोपी हा सदर गुन्ह्यामध्ये दोषी सिध्द झाल्यामुळे तो शिक्षेस पात्र आहे त्यामुळे, त्याला शिक्षा सुनावण्यापूर्वी शिक्षेवरती आरोपी व त्याचे विधीज्ञ यांचे म्हणणे ऐकुन घेणे आवश्यक असल्याकारणामुळे मी याठिकाणी आरोपीचे म्हणणे व त्यांचे विधीज्ञ यांचा युक्तीवाद श्रवण केला आहे. आरोपीचे विधीज्ञ यांनी असा युक्तीवाद केला की, आरोपीचा हा पहिलाच गुन्हा असुन तो घरातील एकमेव कमावता व्यक्ती असुन मजुरी करत आहे. आरोपीचे आई–वडिल मयत झाले असून आरोपी अविवाहीत असून आरोपीवर लहान भाऊ सनी वय वर्षे ११ आणि बहिण रेणूका वय वर्षे १४ यांच्या शिक्षणाची व पालनपोषणाची जबाबदारी आहे. त्यामुळे, आरोपीला कमीत कमी शिक्षा देण्यात यावी, अशी विनंती केली. याउलट, अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी असा युक्तीवाद केला की, आरोपीविरुद्ध उपरोक्त कलमान्वये गुन्हा निर्विवादपणे सिध्द झालेला आहे. आरोपीने विनाकष्टाने पैसा मिळवण्याच्या उद्देशाने फिर्यादीच्या भ्रमणध्वनीची चोरी केली आहे. सदरचा गुन्हा गंभीर स्वरुपाचा असल्यामुळे समाजामध्ये योग्य तो संदेश जाण्यासाठी व गुन्हेगारामध्ये जरब बसवण्यासाठी जास्तीत जास्त शिक्षा देण्यात यावी अशी विनंती केली आहे.

१६. भारतीय न्याय संहिता, २०२३ कलम ३०३(२) अन्वये आरोपीस तीन वर्षांपर्यंत साधी किंवा सश्रम कारावासाची शिक्षा किंवा द्रव्यदंडाची शिक्षा किंवा दोन्ही शिक्षा देता येतात. परंतु, आरोपीचे वय, त्याच्या विरोधात इतर कोणताही गुन्हा प्रलंबित नसल्यामुळे त्याला कायद्याप्रमाणे संपूर्ण शिक्षा देणे योग्य होणार नाही. तसेच आरोपीचे आई–वडिल मयत झाले असल्यामुळे आरोपीवर अल्पवयीन भाऊ नामे सनी वय ११ वर्षे व बहिण वय १४ वर्षे यांचे शिक्षण व पालनपोषणाची जबाबदारी आहे. आरोपी हा मजुरी करत असून सदर उत्पन्नावरुन त्याचा व त्याच्या कुटूंबाचा उदरनिर्वाह चालतो. त्यामुळे, आरोपीवर कुटूंबाच्या पालनपोषणाची व संगोपनाची संपूर्ण जबाबदारी आहे असे गृहित धरले तरी आरोपीने फिर्यादीचा भ्रमणध्वनी विनासंमती स्थानभ्रष्ट करुन चोरी केली होती, त्यामुळे फिर्यादीला विनाकारण मानसिक त्रास झाला होता. आरोपीने फिर्यादीचे उपरोक्त विवेचनाप्रमाणे भ्रमणध्वनी विनासंमती स्थानभ्रष्ट करुन चोरी केल्यामुळे फिर्यादीस विनाकारण शारीरिक, मानसिक व

आर्थिक त्रास झाला आहे. सबब, न्यायाचा समतोल साधण्याकरीता आरोपीला एक महिना सश्रम कारावासाची व द्रव्यदंडाची शिक्षा देणे योग्य होईल. परिणामतः मुद्दा क्रमांक २ करिता पुढीलप्रमाणे अंतिम आदेश पारित करीत आहेः–

**<u>आदेश</u>**

१. आरोपी आकाश विजय शेंडगे यास भारतीय नागरिक सुरक्षा संहिता–२०२३ कलम २७१(२) अन्वये भारतीय न्याय संहिता, २०२३ कलम ३०३(२) या गुन्ह्याकरीता दोषी ठरविण्यात येत असुन, त्याला १ (एक) महिन्याची सक्त मजुरीची कैद व रक्कम रुपये १,०००/– (रुपये एक हजार फक्त) द्रव्यदंडाची शिक्षा देण्यात येत आहे. आरोपीने उपरोक्त द्रव्यदंडाची रक्कम न भरल्यास त्याला पुढे ५ (पाच) दिवस साध्या कैदेची शिक्षा देण्यात येत आहे.

२. आरोपी हा दिनांक १८.०६.२०२६ पासुन स्थानबध्द असल्यामुळे त्यास भारतीय नागरीक सुरक्षा संहिता–२०२३ कलम ४६८ प्रमाणे दिनांक १८.०६.२०२६ ते दिनांक ०८.०७.२०२६ या कालावधीची शिक्षेतुन वजावट देण्यात येत आहे.

५. आरोपीला सुचित करण्यात येते की, सदर न्यायनिर्णयास तो मा. सत्र न्यायालय, बारामती, जि. पुणे येथे पुढील ३० दिवसांपर्यंत आव्हानीत करु शकतो.

६. आरोपीचे जामीनपत्र नसल्यामुळे कोणतेही स्वतंत्र आदेश पारित करण्यात येत नाहीत.

७. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता–२०२३ कलम ४९८ अन्वये जप्त करण्यात आलेल्या भ्रमणध्वनीचा ताबा फिर्यादीकडे अपील कालावधी संपल्यानंतर कायम करण्यात येतो.

८. प्रस्तुत निकालपत्राची प्रत आरोपीस विनाशुल्क, त्वरीत देण्यात यावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात आरोपी व विधीज्ञ यांचेसमक्ष घोषीत केला आहे)

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by SUNIL SHARAD DAHATONDE
Date: 2026.07.09 17:19:16 +0530

दिनांक: ०९.०७.२०२६
स्थळ : दौंड.

**(सुनिल श. दहातोंडे)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
लोहमार्ग न्यायालय, दौंड, जि. पुणे.